# *प्रकरण १*

## *भारतीय बँक प्रणाली*

**१.१ भारतीय अर्थव्यवस्थेत बँक प्रणालीची रचना**

**१.२ बँक व्यवसायाची उत्क्रांती**

**१.३ अनुसूचित व बिगर अनुसूचित बँक यातील फरक**

**१.४ भारतीय बँक व्यवसायावर कोरोना (covid१९) चा झालेला परिणाम**

**१.५ आर्थिक वृद्धी आणि विकासातील बँक प्रणालीची भूमिका**

## ***प्रकरण*** २) मध्यवर्ती बँक -:

- प्रस्तावना ,व्याख्या
- रिझर्व्ह बँकेची उत्क्रांती
- रिझर्व्ह बँकेची कार्ये
- भारतीय रिझर्व्ह बँकेची बदलती भूमिका
- बँकदर , रोख राखीव निधी ,(कायदेशीर )स्थिरता द्रवता प्रमाण
- रेपो रेट ,बँक दर .

## ***प्रकरण*** ३) खासगी क्षेत्रातील बँका -:

- प्रस्तावना ,व्याख्या ,स्वरूप
- खासगी क्षेत्रातील बँकांचे वर्गीकरण
- भारतीय खासगी बँका -: नव्या बँका व जुन्या बँका
- विदेशी बँका
- आर्थिक वृद्धीसाठी खासगी क्षेत्रातील बँकांचे योगदान
- भारतातील खासगी क्षेत्रातील बँकांचे कामकाज व प्रगती
- भारतातील खासगी क्षेत्रातील बँकांपुढील आव्हाने

# <u>*प्रकरण*</u> ४) सार्वजनिक क्षेत्रातील बँका -:

- व्याख्या व स्वरूप
- सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे विभागणी / वर्गीकरण
- भारतीय स्टेट बँक -: भारतीय स्टेट बँकेची उत्क्रांती
- भारतीय स्टेट बँकेची कार्ये
- भारतीय स्टेट बँकेची प्रगती
- राष्ट्रीयीकृत बँका -: बँकांचे सामाजिक नियंत्रण
- राष्ट्रीयीकरण म्हणजे काय?
- राष्ट्रीयीकरणाच्या बाजूने युक्तिवाद
- राष्ट्रीयीकरणाच्या विरोधी युक्तिवाद
- प्रादेशिक ग्रामीण बँक -: अर्थ व्याख्या,उत्क्रांती
- प्रादेशिक ग्रामीण बँक-: संघटन,व्यवस्थापन व उद्दिष्टे
- प्रादेशिक ग्रामीण बँका - प्रगती, मूल्यमापन, समस्या

## ५) मध्यवर्ती निरसन केंद्र चालविणे :-

**१)** आंतर - बँक व्यवहार कमी खर्चात होतात.

**२)** कमी तरलता प्रमाण ठेवून बँका आपले व्यवहार पूर्ण करू शकतात.

**३)** व्यापारी बँकांची तरलता वाढत जाते.

## ६) बँकांचे पर्यवेक्षण -:

**अ]** बँकांच्या कर्जव्यवहांवर देखरेख ठेवणे.

**ब]** बँकांच्या शाखा /कार्यालये उघडण्यास परवाना देणे.

**क]** बँक अध्यक्षाच्या नियुक्तीसाठी तसेच संचालक मंडळाच्या नियुक्तीसाठी शिफारस करणे.

**ड]** गैरव्यवहार व दुर्बल बँकांचा परवाना रद्द करणे.

**इ]** संचालक मंडळात अधिक संचालकांची नियुक्ती करण्याचा अधिकार.

# प्रकरण - ३ खाजगी बँकव्यवसाय

- ## खाजगी बँकव्यवसाय : अर्थ व वैशिष्ठे

व्यापारी बँकांचे वर्गीकरण सार्वजनिक बँक आणि खाजगी क्षेत्रातील बँक असे केले जाते . सन १९६९ मध्ये चौदा प्रमुख बँकांचे आणि १९८० मध्ये आणखी आठ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. तेव्हापासून सार्वजनिक क्षेत्रातील बँक आणि खाजगी क्षेत्रातील बँका असे वर्गीकरण अस्तित्वात आले.

राष्ट्रीयीकरण केलेल्या बॅकांव्यतिरिक्त ज्या व्यापारी बँकांचे भागभांडवल खाजगी भागधारकांनी धारण केलेले आहे त्यांना खाजगी बँक म्हणून ओळखले जाऊ लागले.

### खाजगी बँक : अर्थ व व्याख्या

" खाजगी बँका अशा बँका आहेत कि, ज्यांची मालकी वैयक्तिक किंवा सामान्य भागीदाराच्या हाती आहे किंवा बहुतेक हिस्सेदारी भागधारकांकडे आहे."

"खाजगी बँका म्हणजे अशी संस्था आहे कि , जी मोठ्या प्रमाणात संपत्ती असलेल्या उच्चभ्रू व्यक्तींना बँकिंग आणि वित्तीय सेवा पुरविते . या अर्थाने खाजगी हा शब्द अशाव्यक्तींना देऊ केलेल्या खाजगी ग्राहक सेवेला सूचित करतो .

सर्वसामान्यपणे अशी व्याख्या करता येईल कि," ज्या बँकांची मालकी व व्यवस्थापन खाजगी भागधारकांकडून केली जाते अशा बँकांना खाजगी बँक असे म्हणतात".

## खाजगी बँकांची वैशिष्ठे

१) खाजगी मालकी आणि नियंत्रण

२) नफ्याचा हेतू

३) सरकारी हस्तक्षेपाचा अभाव

४) स्वतंत्र व्यवस्थापन

५) खाजगी भांडवल

६) उच्चतम कार्य संस्कृती

७) प्रगत तंत्रज्ञानाचा वापर

## खाजगी बँकांचे गुण / फायदे

१) निष्ठापूर्वक काम करणारा कर्मचारी

२) ग्राहकांसाठी विविध आवश्यक असणाऱ्या विविध सेवांचे जाळे निर्माण करण्याची क्षमता

३) वैयक्तिक लक्ष

४) वाजवी दराने बँकसेवा मिळतात

५) व्यावसायिक लाभ

## खाजगी बँकांचे दोष / तोटे

१) खात्यामधील शिल्लक रकमेवर अल्प व्याज

२) अधिक व्यवस्थापकीय खर्च

३) खाजगी बँका येतात आणि जातात

## आर्थिक विकासातील खाजगी बँकव्यवसायाची भूमिका

१) भांडवल निर्मिती

२) उद्योजकतेला प्रोत्साहन

३) वित्तपुरवठा

४) कर्जाचे रोख रकमेत रूपांतर

५) प्रादेशिक समतोल

६) उद्योगव्यवसायाचे आधुनिकीकरण

७) पैशाचा लवचिक पुरवठा

८) उद्योग व्यापाराचा विकास

९) सल्लामसलत सेवा

१०) व्याजदरावरील प्रभाव

## भारतातील खाजगी बँकव्यवसायासमोरील आव्हाने

१) ग्रामीण भागातील शाखाविस्तार

२) विदेशी बँकांशी स्पर्धा

३) बिगर- बँकिंग वित्तीय संस्थानशी  स्पर्धा

४) प्राधान्यक्रम क्षेत्राला वित्तपुरवठा

५) नियामक बंधनाचे व्यवस्थापन

६) वाढता खर्च व घटता नफा

७) तंत्रज्ञान व्यवस्थापन

८) ग्राहकांचा विश्वास संपादन करणे आणि टिकवून ठेवणे

९) मालमत्ता गुणवत्ता व्यवस्थापन

१०) बाजाराची शिस्त आणि पारदर्शकता

११) वित्तीय समावेशन

१२) गैरव्यवहार भ्रष्टचार आणि फसवणूक

# खाजगी बँकव्यवसायाचे वर्गीकरण

खाजगी बँका म्हणजे अशा वित्तीय संस्था कि ज्या सरकारी मालकीच्या असण्याऐवजी सामान्यपणे खाजगी व्यक्ती आणि खाजगी व्यवसायसंस्थांच्या मालकीच्या असतात.

सुरवातीला भारतातील सर्वच बँक खाजगी होत्या ; परंतु सन १९६९ च्या राष्ट्रीयीकरणाच्या प्रक्रियेनंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँका व खाजगी क्षेत्रातील बँका असे वर्गीकरण केले जाऊ लागले.

अलीकडच्या काळात खाजगी  क्षेत्रातील बँका  ग्राहकांमध्ये अधिक प्रसिद्ध होत आहेत त्यांचा  व्यापहि   विस्तारत आहे.

### भारतातील खाजगी बँका

भारतीय खाजगी बँकांचे दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते.

अ) सन १९६९ पूर्वी स्थापन झालेल्या परंतु राष्ट्रीयीकरण न झालेल्या बँकांना **जुन्या खाजगी** बँका असे म्हणतात. म्हणतात.

ब) सन १९९१ नंतर स्थापन झालेल्या खाजगी खाजगी बँकांना **नवीन खाजगी बँका** असे म्हटले जाते . सध्या भारतात २२ खाजगी बँका कार्यरत आहेत.

## भारतातील खाजगी बँकांची प्रगती

भारतात खाजगी बँकव्यवसाय स्वतंत्र पूर्व काळापासून अस्तित्वात असला तरी सन १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर सरकारच्या खाजगी क्षेत्राबाबतच्या उदार धोरणामुळे खाजगी बँकांच्या विकासास पोषक वातावरण निर्माण झाले. त्यामुळे खाजगी क्षेत्रातील जुन्या व नवीन बँकांचा झपाट्याने विकास झाला.

१) खाजगी बँकांची संख्या

२) खाजगी बँकांचा शाखाविस्तार

३) ए. टि. म. ची संख्या

४) एकूण ठेवी

५) एकूण मालमत्ता मूल्य

६) भांडवलात वाढ

७) कर्जे आणि अग्रिमे


## विदेशी बँका

" ज्या बँकांचे मुख्यालय भारताबाहेर आहे तसेच त्यांच्या भारतातील शाखांवर संबंधित देशाचे नियंत्रण असते अशा बँकांना **विदेशी किंवा परकीय बँका** असे म्हणतात".

विदेशी बँकेच्या शाखा प्रामुख्याने मोठ्या शहरांच्या ठिकाणी तसेच बंदरांच्या ठिकाणी असतात.

आयात - निर्यात व्यापाऱ्यांना विदेशी चलनाच्या स्वरूपात कर्जपुरवठा करणे आणि विदेशी चलनाची अदलाबदल करणे असे प्रमुख कार्ये या बँका करतात. तसेच व्यापारी बँका करत असलेली इतर सर्व प्रकारची कामेदेखील विदेशी बँका करतात.

तक्ता क्र. 3.1




### 3.2.1 भारतीय खाजगी बँका (Indian Private Banks)

भारतीय खाजगी बँकांचे दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते.

(अ) सन 1969 पूर्वी स्थापन झालेल्या परंतु राष्ट्रीयीकरण न झालेल्या बँकांना 'जुन्या खाजगी बँका' (Old Private Banks) असे म्हणतात.

(ब) सन 1991 नंतर स्थापन झालेल्या खाजगी बँकांना 'नवीन खाजगी बँका' (New Private Banks) असे म्हटले जाते. सध्या भारतात 22 खाजगी बँका कार्यरत आहेत.

**(अ) जुन्या खाजगी बँका** *(Old Private Banks)* :

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 1 जानेवारी, 1949 रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण करून तिच्यावर केंद्र सरकारची मालकी प्रस्थापित करण्यात आली. 1 जुलै, 1955 रोजी इम्पीरिअल बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात येऊन तिचे 'स्टेट बँक ऑफ इंडिया' असे नामकरण करण्यात आले. 10 सप्टेंबर, 1959 रोजी विविध संस्थानांमधील सात बँकांचे प्रादेशिक अस्तित्व राखून त्यांचे भारतीय स्टेट बँकेत विलीनीकरण न करता त्यांना 'स्टेट बँकेच्या संलग्न बँका' म्हणून त्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. त्यानंतर 19 जुलै, 1969 रोजी चौदा व्यापारी बँकांचे व पुन्हा 15 एप्रिल, 1980 रोजी आणखी सहा व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. सन 1969 व 1980 च्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणाबरोबर जवळजवळ 91 टक्के व्यापारी बँकव्यवसाय सार्वजनिक क्षेत्रात आला.

सन 1969 पासून खाजगी क्षेत्रात बँका स्थापन करण्यासाठी परवाना देणे रिझर्व्ह बँकेने बंद केले. मात्र सन 1969 पूर्वी स्थापन झालेल्या तुलनेने लहान किंवा ठरविलेल्या निकषांमध्ये न बसणाऱ्या बँका राष्ट्रीयीकरणाच्या कक्षेबाहेर राहिल्या. त्यांची खाजगी मालकी टिकून राहिली; अशा बँकांना 'जुन्या खाजगी बँका' असे म्हटले जाते.



1 एप्रिल, 2020 रोजी पंधरा जुन्या खाजगी बँका कार्यरत आहेत. त्या तक्ता क्र. 3.2 मध्ये दर्शविलेल्या आहेत.

**तक्ता क्र. 3.2 : भारतातील जुन्या खाजगी बँका (1 एप्रिल, 2020 रोजी)**

| बँकेचे नाव | स्थापना वर्ष | मुख्यालय |
|---|---|---|
| 1. सिटी युनियन बँक | 1904 | तंजावर (तमिळनाडू) |
| 2. करूर वैश्य बँक | 1916 | करूर (तमिळनाडू) |
| 3. कॅथॉलिक सिरीयन बँक | 1920 | थ्रिसुर (केरळ) |
| 4. तमिळनाडू मर्चंटाईल बँक | 1921 | थुठीकडू (तमिळनाडू) |
| 5. नैनिताल बँक | 1922 | नैनिताल (उत्तराखंड) |
| 6. कर्नाटक बँक | 1924 | मंगळुरू (कर्नाटक) |
| 7. लक्ष्मी विलास बँक | 1926 | चेन्नई (तमिळनाडू) |
| 8. धनलक्ष्मी बँक | 1927 | थ्रिसुर (केरळ) |
| 9. साऊथ इंडियन बँक | 1929 | थ्रिसुर (केरळ) |
| 10. डेव्हलपमेंट क्रेडिट बँक | 1930 | मुंबई (महाराष्ट्र) |
| 11. फेडरल बँक | 1931 | अलुवा (केरळ) |
| 12. जम्मू आणि काश्मीर बँक | 1938 | श्रीनगर (जम्मू आणि काश्मीर) |
| 13. रत्नाकर बँक | 1943 | मुंबई (महाराष्ट्र) |
| 14. इंडसइंड बँक | 1964 | मुंबई (महाराष्ट्र) |
| 15. आय.डी.बी.आय. बँक | 1964 | मुंबई (महाराष्ट्र) |

**(ब) नव्या खाजगी बँका** *(New Private Banks)* :

सन 1991 च्या आर्थिक सुधारणानंतर स्थापन करण्यात आलेल्या वित्तीय क्षे सुधारणाविषयक नरसिंहम समितीने बँकिंग क्षेत्रावरील नियंत्रण दूर करण्याबाबत शिफारस केल्या. त्यानुसार भारतीय रिझर्व्ह बँकेने जानेवारी 1993 मध्ये खाजगी क्षेत्रात नवीन बँ स्थापन करण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली. त्यानुसार नवीन खाजगी बँका सु करण्यासाठी पुढील निकष निश्चित करण्यात आले :

(1) बँकेचे किमान मालमत्ता मूल्य 200 कोटी ₹ असावे.

(2) वसूल भांडवलातील प्रवर्तकाचा हिस्सा किमान 25 टक्के असावा.

(3) व्यवसाय सुरू केल्यानंतर तीन वर्षांनी बँकेने आपले समभाग विक्रीस उपलब्ध करावे.

| बँकेचे नाव | मुख्यालय | शाखा | ए.टी.एम. |
|---|---|---|---|
| 11. सिटी बँक एन.ए. | अमेरिका | 35 | 531 |
| 12. सहकारी रबोबँक यू. ए. | नेदरलँड्स | 1 | – |
| 13. क्रेडिट एग्रीकॉल कॉर्पोरेट अँन्ड इन्व्हेस्टमेंट बँक | फ्रान्स | 5 | – |
| 14. क्रेडिट सुइस ए. जी. | स्वित्झर्लंड | 1 | – |
| 15. सी.टी.बी.सी. बँक कंपनी लि. | तैवान | 2 | – |
| 16. डी.बी.एस. बँक इंडिया लि. | सिंगापूर | 25 | 43 |
| 17. हॉश बँक ए. जी. | जर्मनी | 17 | 32 |
| 18. दोहा बँक (Q.P.S.C.) | कतार | 3 | – |
| 19. एमिरेट्स एन.बी.डी. बँक (पी.जे.एस.सी.) | यू.ए.ई. | 1 | – |
| 20. फस्ट अबू धाबी बँक (पी.जे.एस.सी.) | यू.ए.ई. | 1 | – |
| 21. फस्ट्रँड बँक लि. | दक्षिण आफ्रिका | 1 | – |
| 22. हाँगकाँग अँन्ड शांघाय बँकिंग कॉर्प. लि. | हाँगकाँग | 26 | 88 |
| 23. इंडस्ट्रिल अँन्ड कॉमर्स बँक ऑफ चीन | चीन | 1 | – |
| 24. औद्योगिक बँक ऑफ कोरिया | दक्षिण कोरिया | 1 | – |
| 25. जे. पी. मॉर्गन चेस बँक नॅशनल असोसिएशन | अमेरिका | 4 | – |
| 26. जे. एस. सी. व्ही. टी. बँक | रशिया | 1 | – |
| 27. के.ई.बी. हाना बँक | बेल्जिअम | 1 | – |
| 28. कोकमिन बँक | दक्षिण कोरिया | 1 | – |
| 29. क्रुंग थाई बँक पब्लिक कंपनी लि. | थायलंड | 1 | – |
| 30. मशरेक बँक पीएससी | यू.ए.ई | 1 | – |
| 31. मिझुहो बँक लि. | जपान | 5 | – |
| 32. एम. यू. एफ. जी. बँक लि. | जपान | 5 | – |
| 33. नॅशनल ऑस्ट्रेलिया बँक | ऑस्ट्रेलिया | 1 | – |
| 34. नेटवेस्ट मार्केट्स पीएलसी | इंग्लंड | 1 | – |

पुढे चालू...



| बँकेचे नाव | मुख्यालय | शाखा | ए.टी.एम. |
|---|---|---|---|
| 35. पी. टी. बँक मेबॅक इंडोनेशिया टीबीके | इंडोनेशिया | 1 | – |
| 36. कतार नॅशनल बँक (QPSC) | कतार | 1 | – |
| 37. स्बेर बँक | रशिया | 1 | – |
| 38. एस.बी.एम. बँक (इंडिया) लि. | कॅनडा | 4 | – |
| 39. शिन्हन बँक | दक्षिण कोरिया | 6 | – |
| 40. सोशिएट जनरल | फ्रान्स | 4 | – |
| 41. सोनाली बँक | बांगलादेश | 2 | – |
| 42. स्टँडर्ड चार्टर्ड बँक | इंग्लंड | 100 | 220 |
| 43. सुमितोटो मित्सुई बँकिंग कॉर्पोरेशन | जपान | 2 | – |
| 44. युनायटेड ओव्हरसीज बँक लि. | सिंगापूर | 1 | – |
| 45. वेस्टपक बँकिंग कॉर्पोरेशन | ऑस्ट्रेलिया | 1 | – |
| 46. वूरी बँक | दक्षिण कोरिया | 3 | – |
| एकूण | | 300 | 914 |

## 3.3 आर्थिक विकासातील खाजगी बँकव्यवसायाची भूमिका

## ROLE OF PRIVATE BANKING IN ECONOMIC DEVELOPMENT

देशाच्या सर्वांगीण आर्थिक विकासाचा बँकव्यवसायाशी जवळचा संबंध आहे. किंबहुना, देशाच्या विकासाचा बँक हा मूलभूत आधार असून बँकिंग क्षेत्राच्या अस्तित्वामुळेच विकासाची प्रक्रिया सुरू होते व वेगवान होत जाते. शेती, उद्योग, सेवाक्षेत्र, व्यापार, व्यवसाय, बांधकाम क्षेत्र तसेच आर्थिक विकासाच्या योजना व कार्यक्रमांना लागणारे भांडवल पुरविण्यात खाजगी बँका महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात.

देशाच्या आर्थिक विकासात खाजगी बँकांची भूमिका पुढील मुद्द्यांच्या आधारे अधिक स्पष्ट होईल :

1. **भांडवलनिर्मिती** *(Capital Formation)* : देशाच्या औद्योगिक विकासाचा वेग देशातील भांडवलनिर्मितीवर अवलंबून असतो. देशातील भांडवलसंचय वाढविण्यासाठी बचत वाढविणे आवश्यक असते. लोकांना बचत करण्यास प्रवृत्त करणे, बचतीच्या सवयी वाढविणे आणि निर्माण झालेली बचत बँकेकडे आकर्षित करण्याचे कार्य खाजगी बँका

'ग्लोबल ट्रस्ट बँक' ही उदारीकरणानंतरची पहिली खाजगी बँक होती. नंतर तिचे ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्समध्ये विलीनीकरण करण्यात आले. त्यानंतर एच.डी.एफ.सी., ॲक्सिस बँक, आय.सी.आय.सी.आय. बँक या बँकांची स्थापना करण्यात आली. सन 1993 नंतर खाजगी क्षेत्रात नवीन बँका स्थापन करण्यास परवानगी मिळाली असली तरी 200 कोटी किमान मालमत्ता मूल्याची मर्यादा व परवाना मिळविण्यातील अनेक अडचणी आल्या. त्यामुळे खाजगी क्षेत्रातील नवीन बँकांची संख्या फारशी वाढली नाही.

1 एप्रिल, 2020 रोजी भारतात सात नव्या खाजगी बँका कार्यरत आहेत. त्या तक्ता क्र. 3.3 मध्ये दर्शविलेल्या आहेत.

**तक्ता क्र. 3.3 : भारतातील नवीन खाजगी बँका (1 एप्रिल, 2020 रोजी)**

| बँकेचे नाव | स्थापना वर्ष | मुख्यालय |
|---|---|---|
| 1. ॲक्सिस बँक | 1993 | मुंबई (महाराष्ट्र) |
| 2. एच.डी.एफ.सी. बँक | 1994 | मुंबई (महाराष्ट्र) |
| 3. आय.सी.आय.सी.आय. बँक | 1994 | मुंबई (महाराष्ट्र) |
| 4. कोटक महिंद्रा बँक | 2003 | मुंबई (महाराष्ट्र) |
| 5. येस बँक | 2004 | मुंबई (महाराष्ट्र) |
| 6. बंधन बँक | 2015 | कोलकता (पश्चिम बंगाल) |
| 7. आय.डी.एफ.सी. फर्स्ट बँक | 2015 | मुंबई (महाराष्ट्र) |

### 3.2.2 विदेशी बँका (Foreign Banks)

"ज्या बँकांचे मुख्यालय भारताबाहेर आहे तसेच त्यांच्या भारतातील शाखांवर संबंधित देशाचे नियंत्रण असते अशा बँकांना विदेशी किंवा परकीय बँक असे म्हणतात."

विदेशी बँकेच्या शाखा प्रामुख्याने मोठ्या शहरांच्या ठिकाणी तसेच बंदराच्या ठिकाणी असतात. आयात-निर्यात व्यापाऱ्यांना विदेशी चलनाच्या स्वरूपात कर्जपुरवठा करणे आणि विदेशी चलनाची अदलाबदल करणे असे प्रमुख कार्य या बँका करतात. तसेच व्यापारी बँका करत असलेली इतर सर्व प्रकारची कामेदेखील विदेशी बँका करतात.

मार्च 2020 अखेर भारतात 46 विदेशी बँकव्यवसाय करत आहेत.

एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश वसाहतीमधील नोकरदार व ब्रिटिश सैन्याला आधुनिक बँकिंग सेवा, चलन विनिमय आणि मायदेशी पैसे पाठविण्याच्या गरजेतून भारतात विदेशी बँकांनी प्रवेश केला. ईस्ट इंडिया कंपनीच्या कारकिर्दीत व्यापाऱ्यांनी बँकविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी सुरुवातीला बँका, एजन्सी हाऊसेस आणि प्रेसिडेन्सी बँक यांची स्थापना केली होती. परंतु नंतरच्या काळात बहुतेक एजन्सी हाऊसेस अपयशी ठरले आणि बंद पडले तर तीन मोठ्या प्रेसिडेन्सी बँका आधी इम्पीरिअल बँका व नंतर भारतीय स्टेट बँकेत रूपांतरित झाल्या. ब्रिटिशांच्या मालकीच्या व ब्रिटिशांकडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या स्वातंत्र्यापूर्वीच्या बँका भारतात विदेशी बँकाच होत्या.



भारतात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा, 1934 हा भारतीय बँक क्षेत्रामध्ये मैलाचा दगड मानला जातो. या कायद्यान्वये सन 1935 मध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना करण्यात आली. त्यानंतर इम्पीरिअल बँकेचे भारतीय स्टेट बँकेत रूपांतर आणि नंतरील काळात 1969 व 1980 मध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण या घटनांचा विदेशी बँकांवर फारसा परिणाम झाला नाही. त्यांनी बदलत्या परिस्थितीचा पुरेपूर उपयोग करून सर्वोत्कृष्ट सेवा, नावीन्यपूर्ण आणि अत्याधुनिक पद्धती यांच्या जोरावर भारतीय बाजारात जम बसविला आणि आपले स्थान टिकवून ठेवले.

सन 1991 मध्ये नरसिंहम समितीच्या शिफारशीमुळे नवीन विदेशी व खाजगी क्षेत्रातील बँकांना परवाना देण्याच्या निर्णयामुळे बँक क्षेत्रात नवीन युगाला सुरुवात झाली. सन 2005 मध्ये रिझर्व्ह बँकेने परदेशी बँकांच्या भारतातील विकासासाठी आराखडा प्रसिद्ध केला. त्यानुसार भारतातील बँकिंग क्षेत्राची कार्यक्षमता आणि स्थिरता वाढविण्यासाठी अंतर्गत खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे एकत्रीकरण करणे आणि परदेशी बँकांची हळूहळू वाढ करण्यावर भर देणे असे दोन दृष्टिकोन स्वीकारण्यात आले.

सन 2008 मध्ये जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या आर्थिक संकटाच्या काळातदेखील भारतीय बँका उत्कृष्ट कामगिरी करत होत्या. त्यामुळे विदेशी बँकांना भारतातील बँकिंग पर्यावरण अधिक आशादायक वाटू लागले. त्यामुळेच आव्हानात्मक राजकीय स्थिती, तीव्र स्पर्धा आणि वित्तीय सेवाविषयक नियम बदलत असतानाही विदेशी बँका सर्वोत्कृष्ट सेवा प्रदान करत आहे.

पुढील तक्ता क्र. 3.4 मध्ये भारतातील विदेशी बँकांची ढोबळ माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. 3.4 : भारतातील विदेशी बँका (1 एप्रिल, 2020 रोजी)**

| बँकेचे नाव | मुख्यालय | शाखा | ए.टी.एम. |
|---|---|---|---|
| 1. ए. बी. बँक लिमिटेड | बांगलादेश | 1 | – |
| 2. अबू धाबी कमर्शिअल बँक | यू.ए.ई. | 2 | – |
| 3. अमेरिकन एक्सप्रेस बँकिंग कॉर्पोरेशन | अमेरिका | 1 | – |
| 4. ऑस्ट्रेलिया अँन्ड न्यूझीलंड बँकिंग ग्रुप लि. | ऑस्ट्रेलिया | 3 | – |
| 5. बँक ऑफ अमेरिका, नॅशनल्ल असोसिएशन | अमेरिका | 4 | – |
| 6. बँक ऑफ बहारीन आणि कुवेत | बहारीन | 4 | – |
| 7. बँक ऑफ सिलोन | श्रीलंका | 1 | – |
| 8. बँक ऑफ नोव्हास्कॉशिया | कॅनडा | 3 | – |
| 9. बार्कलेज बँक | इंग्लंड | 6 | – |
| 10. बी.एन.पी. परिबास | फ्रान्स | 8 | – |

पुढे चालू . . .